Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं./परीक्षा–३/१६९९
पुणे – ४११००४
दिनांक –१४/०५/२०२५

प्रति,

१ मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२ मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण.
३ मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई – ४०००३०.
४ मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई ४०००२०.
५ मा. संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/ सोलापूर/ नाशिक.
६ सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी.
७ मा. संपादक, सर्व वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या.

विषय – जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.

महोदय,

मंडळामार्फत जून–जुलै २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ.
पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ, यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे
३) अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
४) ऑनलाईन विभाग, राज्य मंडळ, पुणे
५) लेखा विभाग, राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर –

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे – ४११००१.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४

विषय:—जून—जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत

।। प्रकटन ।।

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी)फेब्रुवारी—मार्च २०२५ परीक्षेचा निकाल दिनांक १३/०५/२०२५ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून—जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु.—मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट न झालेले), व जून—जुलै २०२५ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १०वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत –

शुल्क प्रकार	विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा	माध्यमिक शाळांनी RTGS / NEFT द्वारे रक्कम भरावयाची तारीख	माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा करणे व RTGS / NEFT पावती / चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख
नियमित शुल्क	गुरूवार, दिनांक १५/०५/२०२५ ते शनिवार, दिनांक २४/०५/२०२५	शुक्रवार दि.३०/०५/२०२५ पर्यंत	सोमवार दि.०२/०६/२०२५
विलंब शुल्क	रविवार, दिनांक २५/०५/२०२५ ते गुरूवार, दिनांक २९/०५/२०२५		

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यामार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रुवारी—मार्च २०२५ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची त्या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु.—मार्च २०२५ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जून—जुलै २०२५, फेब्रु.—मार्च २०२६ व जून—जुलै २०२६ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३ कौशल्य सेतु अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्ड कॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

४ सर्व माध्यमिक शाळांनी मंडळाच्या अधिकृत Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून NEFT /RTGS द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा.

५ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

६ माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

७ नियमित व विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

८ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

क्रमांक पुविमं/माध्य.–क/२७४०
पुणे–४११००५
दिनांक:- १६/०५/२०२५.

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा
सर्व मान्यता प्राप्त शाळा व
जिल्हा:- **पुणे, अहमदनगर, सोलापूर.**

विषय:- जून–जुलै-२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इ.१०वी आवेदनपत्रऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत.....

संदर्भ :-राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा. मं./परीक्षा–३/१६९९ दि. १४/०५/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व मान्यता प्राप्त शाळा इ.१०वी यांना कळवीण्यात येते की, राज्यमंडळ पुणे यांनी सूचीत केल्यानुसार जून–जुलै -२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षाच्या तारखांबाबत जे निर्देश देण्यात आले आहेत त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

16.05.25

(डॉ.माधुरी सावरकर)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे–०५.